MHNG110003372026

**<u>नियमीत दिवाणी दावा क्र.१७/२०२६ मधील निशाणी क्र.०१ वरील आदेश</u>**

(गुंडेराव रोटके विरुध्द मानिक व ईतर)

०१. निशाणी क्रमांक ०८ वर उभय पक्षकार यांनी आपसात तडजोड झाल्याबाबत सुलेहनामा व निशाणी क्र.०९ प्रमाणे आवॉर्ड दाखल केला आहे. त्यातील मजकुर उभय पक्षकार यांनी वाचुन मान्य केला आहे. त्यावरील सह्या व अंगुठे निशाणी मान्य केली आहे. त्यांच्या विधीज्ञानी त्यांची ओळख दिली.

०२. याठिकाणी मी आदरणीय नामदार सर्वोच्च न्यायालय यांच्या **के. रघुनंदन व ईतर विरुध्द अली हुसैन साबीर व ईतर, सिव्हील अपील क्रमांक ३५७२/२००८ न्यायनिर्णय दिनांक १४ मे, २००८** या न्यायानिवाड्याचा आधार घेत आहे. या न्यायनिवाड्यातील परीच्छेद क्रमांक २९ मध्ये आदरणीय नामदार सर्वोच्च न्यायालय यांनी असे न्यायतत्व प्रतिपादीत केले आहे की, जर तडजोड हुकुमनाम्याद्वारे नवीन हक्क निर्माण होत असतील किंवा सोडले जात असतील तर अशा हुकूमनाम्याची नोंदणी भारतीय नोंदणी कायदा १९०८ चे कलम १७ नुसार करणे बंधनकारक आहे.

०३. उपरोक्त न्यायनिवाड्यातील मार्गदर्शक तत्वाच्या पार्श्वभूमीवर अभिलेखाचे अवलोकन केले असता, प्रतिवादी यांनी वादीच्या लाभात वादमिळकतीतील हक्क सोडुन दिले आहेत. मालमत्ता हस्तांतरण कायद्यानुसार खरेदी, गहाण, बक्षीस याद्वारेच स्थावर मालमत्तेचे हस्तांतरण होवु शकते. परंतु, प्रतीवादींनी निशाणी क्र.०८ वरील सुलेहनाम्याचा आधार घेवुन दावा मिळकतीतील त्यांच्या हिस्याची मालकी वादी हक्कात हस्तांतर केली आहे. त्यामुळे सदर सुलेहनाम्या आधारे होणा–या हुकूमनाम्याची नोंदणी होणे आवश्यक

आहे. तसेच भारतीय नोंदणी कायदा, १९०८ मध्ये महाराष्ट्र सरकारने सुधारणा करुन कलम ८९–अ चा अंतर्भाव केला आहे. त्यानुसार स्थावर मालमत्तेमध्ये निर्माण होणा–या हक्काबाबत, मालमत्तेत हक्क सोडल्याबाबत हस्तांतरीत केल्याबाबतचे हुकूमनामे नोंदणी अधिका–याकडे न्यायालयाने पाठविणे आवश्यक आहे.

०४. निशाणी क्रमांक ०८ व आवॉर्ड निशाणी क्र.०९ वरील सुलेहनामा उभय पक्षकारांनी मान्य केला आहे. सबब मी, खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

०१. अवॉर्ड निशाणी क्र.०९ व सुलेहनामा निशाणी क्र.०८ ची प्रत भारतीय नोंदणी कायदा, १९०८ चे कलम ८९–अ प्रमाणे दुय्यम निबंधक, नोंदणी कार्यालय, कुही ता. कुही जि. नागपुर यांच्याकडे पाठविण्यात यावी.

०२. दुय्यम निबंधक, नोंदणी कार्यालय, कुही ता. कुही जि. नागपुर यांच्याकडे अवॉर्ड निशाणी क्र.०९ व सुलेहनामा निशाणी क्र.०८ ची नोंद झाल्यानंतर त्यानुसार अंमल करण्यात येवुन त्यानंतरच दावा मिळकतीच्या महसुल अभिलेखात त्याप्रमाणे नोंदी करण्यात याव्या.

PARASRAM KUNDLIK MUTKULE

Digitally signed by PARASRAM KUNDLIK MUTKULE
Date: 2026.03.14 15:40:19 +0530

दिनांक – १४/०३/२०२६.

**(पी.के.मुटकुळे)**
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
कुही जि. नागपुर.